झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-१/झोपुआ/प्र.क्र.१७७/१७३१/२०१८
दिनांक : २४/०७/२०१८.

## "झोपडपट्टी पुनर्वसन आदेश"

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि. ३०/६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०१/१२/२००५ रोजी अंतिमतः प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसक मे. आनंद डेव्हलपर्स यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि. ३१/०८/२०१३ रोजी प्रस्ताव दाखल केलेला आहे. प्रस्तावाच्या अनुषंगाने उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी सि.स.नं. ५६१/अ,५६१/ब-१/अ,५६१/ब/१ आणि ५६२ नाना पेठ,पुणे या जागेवरील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन करुन उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी दि. ०३/०५/२०१६ अन्वये सादर केलेल्या परिशिष्ट-२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर जमिनीवर एकूण २७३ झोपडीधारकांपैकी असून त्यापैकी पात्र निवासी २०६, पात्र बिगर निवासी ३९ व संयुक्त ० असे एकुण २४५ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत. १४ निवासी झोपडीधारक व १२ बिगर निवासी झोपडीधारक अपात्र ठरले असून १ सार्वजनिक प्रयोजनासाठीची इमारत व १ गोठा आहे. २७१ झोपडीधारकांपैकी २४५ झोपडीधारकांनी म्हणजेच एकूण ९०.४०% झोपडीधारकांनी मे. आनंद डेव्हलपर्स यांना पुनर्वसन योजनेसाठी संमती दिलेली आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व ती घोषित नसलेमुळे उप आयुक्त परिमंडळ क्र.३, पुणे महानरपालिका यांनी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेचा अहवाल त्यांचेकडील कार्यालयीन पत्र जा.क्र. ३१३३ दि. ११/०४/२०१४ रोजी सादर केला आहे. तसेच कार्यालयीन परिपत्रक क्रमांक २१५ दि. ०१/०७/२०१७ मधील कार्यपद्धतीनुसार सक्षम प्राधिकारी यांनी प्रत्यक्ष जागेवर दि.२७/०७/२०१७ रोजी स्थळपाहणी केली असून त्याबाबतचा अहवाल सादर केला आहे.सदर दोन्ही अहवालानुसार सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे;

आणि ज्याअर्थी ;महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुर्नविकास) सुधारित अधिनियम २०१८ चे तरतूदीनुसार, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ व मुळ अधिनियमातील ३(क) चे तरतूदीनुसार अनुसूचीमध्ये नमूद मिळकतीचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेची पूर्वसुचना, महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १४/०६/२०१८, पृष्ठ क्र.०९ वर प्रसिध्द करणेत आले असून त्यास योजनाक्षेत्रातही प्रसिध्दी देणेत आली आहे.तसेच विकसक मे. आनंद डेव्हलपर्स व उपायुक्त, भूसंपादन व व्यवस्थापन विभाग, पुणे महानगरपालिका यांना सदरची नोटीस बजावण्यात आली आहे. सदर बाबतीत ३० दिवसांच्या(दि. १४/०७/२०१८ अखेर) विहित मुदतीत सुचना / हरकती प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे अनुसुचिमध्ये निर्दिष्ठ क्षेत्र उक्त कलमाखाली झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी पांडूरंग पोले, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास ) सुधारित अधिनियम २०१८ चे कलम ३ क (१) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अनुसूचित नमुद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे. सदरचे घोषित पुनर्वसन क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास ) सुधारित अधिनियम २०१८ चे कलम ३ क (१) व झोपुप्रा पुणे चे नियमावलीतील SR १९(१) मधील तरतूदीनुसार विकसित केले जाईल.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तिस आदेश प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास ) सुधारित अधिनियम २०१८ चे कलम ३ क (२) मधील तरतूदीनुसार शिखर तक्रार निवारण समिती, ४ था मजला, झो.पु.प्रा. कार्यालय, प्रो. अनंत कणेकर मार्ग, बांद्रा (पू.) मुंबई ११ अपील दाखल करता येईल आणि शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

**<u>अनुसूची</u>**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| सि.स.नं. ५६१/अ,५६१/ब-१/अ,५६१/ब/१ आणि ५६२ नाना पेठ | ६७४०.४३ चौ. मी. | **पुर्वेस -** लागू रस्ता |
| | | **पश्चिमेस -** लागू रस्ता |
| | | **उत्तरेस -** न. भू. क्र. ६१५ व ६२० ते ६२७ |
| | | **दक्षिणेस -** न. भू. क्र. ५६३,५६४,५६५ व ५६६ |

सदरचा आदेश हा माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला.

**(पांडूरंग पोले)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक -